


World Women's Day programme.

Remark /Conclusion: -

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

IQAC Co-ordinator

Principal
Ramrao Zanak College
Malegaon, Dist. Washim

दि. 15/08/2019

दै. देशोन्नती

**वाशिम जिल्हा** (रिसोड, मालेगाव, मंगरुळपीर, कारंजा, मानोरा)

# एड्स रोगाबाबत समाजात जागृती करावी!

## डॉ. विनोद रत्नपारखी यांचे आवाहन



*तालुका प्रतिनिधी* / १४ ऑगस्ट

**मालेगाव :** एच.आय.व्ही. एड्स या महाभयंकर रोग असून, त्याविषयी रेडरिबन क्लब व महाविद्यालय विद्यार्थ्यांनी समाजात जागृती करण्याचे आवाहन ग्रामीण रुग्णालयाचे मालेगाव येथील डॉ. विनोद रत्नपारखी यांनी रासेयो व ग्रामीण रुग्णालय मालेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त बोलताना केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी प्राचार्य मुरलीधर पवार प्रमुख मार्गदर्शक डॉ.रत्नपारखी, रामेश्वर साळूंके, प्रा. नंदकिशोर गायकवाड रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. भिमराव जांभरुणकर विचारमंचावर विराजमानं होते. यावेळी पुढे बोलताना डॉ. रत्नपारखी यांनी एच.आय.व्ही. लागण होण्याची प्रमुख कारणे जसे असुरक्षित लैंगिक सबंध, दूषित रक्त, दूषित सुया व इंजेक्शने, एच. आय.व्ही. बाधीत एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीला होतो असे कारणे सांगितले. तसेच त्यांनी एड्सबद्दल गैरसमज दूर केले. एकत्र जेवण केल्याने, पोहल्याने, सोबत खेळल्याने,' एकच शौचालय वापराने एच. आय. व्ही. ची बांधा होत नसल्याचे सांगितले.. त्यानंतर रामेश्वर सांळूके क्षयरोग समुपदेशक यांनी क्षय रोगाची लक्षणे जसे सतत ताप, पंधरा दिवसांपासून असणारा खोकला, वजन कमी होणे, भूक मंदावणे ही क्षयरोगाची लक्षणे असल्याचे प्रतिपादन करुन त्यावरील उपाययोजना सांगितल्या. तालूका टी.बी. पर्यवेक्षक मालेगाव तालुका पर्यविक्षक रामेश्वर सांळूके यांनी अशा रुग्णाची तपासणी करुन उपचार घेण्याचे आवाहन केले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य मुरलीधर पवार म्हणाले की, समारात्मक दृष्टीकोन ठेवून रासेयो स्वयंसेवकांनी एड्स सबंधी जनजागृती करुन सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे आवाहन केले. रेड रिबनच्या क्लब मार्फत एच. आय. व्ही. एड्सबाबत सामाजिक जागृत राहण्याचे आवश्यक असल्याचे सांगितले. प्राचार्य पवार यावेळी पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी स्वतः सक्षम होवून रोगमुक्त राहून सशक्त व बलाढ्य भारत निर्माण करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. भिमराव जांभरुणकर यांनी केले. संचालन ज्योती वानखेडे हिने तर आभार प्रदर्शन सागर पट्टेबहादूर यांनी केले. कार्यक्रमाला प्राध्यापक व कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुरुवातीला गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर रासेयोच्यावतीने महाविद्यालय परिसराची साफ सफाई करण्यात आली.

IQAC Co-ordinator

Principal
Principal
Ramrd... k College
Malegaon, Dist. Washim

21 Aug - 2018

# एडस जनजागृती ही सामाजिक बांधिलकी - डॉ. रवि भिसे

*तालुका प्रतिनिधी/* २१ ऑगस्ट

**मालेगाव** : एडस हा महाभंयकर रोग असून त्याबाबत सामाजिक जनजागृती करणे गरजेचे असून एडस जनजागृती करणे ही सामाजिक बांधीलकी असल्याचे प्रतिपादन जिल्हा सामान्य रुग्णालयाचे जिल्हा पर्यवेक्षक डॉ. रवि भिसे यांनी केले. मालेगाव येथे आयोजीत कार्यक्रमात ते बोलत होते.

स्थानिक रामराव झनक महाविद्यालय मालेगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना तथा रेड रिबन क्लबव्दारा एडस जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. युवा पंधरवाडयानिमित्त आयोजीत या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून वाशिम जिल्हा सामान्य रुग्णालयाचे पर्यवेक्षक डॉ. रवि भिसे हे होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य एम.आर. पवार हे होते.

कार्यक्रम मार्गदर्शक म्हणून डॉ. रामेश्वर सांळुके, डॉ. विनोद रत्नपारखी यांची उपस्थिती होती. तर मंचावर रा.से.यो अधिकारी प्रा. नंदकिशोर गायकवाड, प्रा. भिमराव जांमरुकर यांची उपस्थिती होती.




आपल्या प्रमुख मार्गदर्शनपर भाषणातून बोलतांना डॉ. रवि भिसे यांनी एडस हा महाभंयकर आजार आहे. त्यामुळे या आजाराबाबत जनजागृती करणे गरजेचे आहे.

एडस रोगा बाबत जिल्हा सामान्य रुग्णालयात मोफत तपासणी केल्या जाते व औषधी मोफत दिल्या जातात यावेळी डॉ. रामेश्वर सांळुके यांनी क्षयरोगाची लक्षणे व त्यावर उपाययोजनाची माहिती उपस्थिती विद्यार्थ्यांना दिली. तर डॉ. विनोद रत्नपारखी यांनी वरील दोन्ही आजाराबाबत माहिती दिली.

प्राचार्य एम.आर.पवार यांनी एडस व क्षयरोगाबाबत माहिती देतांना विद्यार्थ्यांनी या रोगाबाबत माहिती घेवून सामाजिक प्रबोधन करावे असे, आवाहनही त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन रा. से. यो कार्यक्रम अधिकारी प्रा. नंदकिशोर गायकवाड यांनी तर संचालन प्रा. भिमराव जांभरुनकर यांनी केले. कार्यक्रमाला प्राध्यापक व महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

PRINCIPAL
Ramrao Zanak Arts & Commerce,
College, Malegaon Dist. Washim







**Remark /Conclusion: -**

.............................................................................................................................................

.............................................................................................................................................

.............................................................................................................................................

**IQAC Co-ordinator**

**Principal**

Principal
Ramrao Zanak College
Malegaon Dist. Washim

16·02·18

# रामराव झनक महाविद्यालयात व्यक्तीमत्व विकास कार्यशाळा

तभा वृत्तसेवा
मालेगाव, १६ फेब्रुवारी

संवाद कौशल्यातून व्यक्तिचे व्यक्तिमत्व फुलून दिसते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी संवाद कौशल्यातून व्यक्तिमत्व विकास घडवावा, असे मत युवा पत्रकार सुशील भिमजीयाणी यांनी केले.

येथील रामराव झनक कला व वाणिज्य महाविद्यालयात इंग्रजी विभागाव्दारा आयोजित संवाद कौशल्यातून व्यक्तिमत्व विकास या एकदिवशीय मार्गदर्शन कार्यशाळेत प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रामराव झनक महाविद्यालयाचे प्राचार्य मुरलीधर पवार हे होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून गोटे कॉलेजच्या इंग्रजी विभागप्रमुख प्रा.डॉ. प्राची पाथरकर, पत्रकार सुरेश डोंगरे, प्रा. भिमराव जांभरुणकर, प्रा. जमधाडे, भंडारी आदींची मंचावर उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात इंग्रजी साहित्याचे जनक विल्यम शेक्सपियर यांच्या प्रतिमा पुजन करुन झाली.



मार्गदर्शन करताना प्रा. प्राची पाथरकर व उपस्थित मान्यवर

यावेळी संवाद कौशल्यातून व्यक्तिमत्व विकास या विषयावर आपले मत मांडतांना सुशील भिमजीयाणी म्हणाले की, विद्यार्थ्यांनी दररोज वर्तमानपत्र वाचनाची सवय लावावी. वेळेचे व स्वच्छतेचे महत्व समजून घ्यावे. सुक्ष्मनिरिक्षण व सकारात्मक विचारसरणी आदी गोष्टींमधून व्यक्तीमत्व विकास घडत असतो. देशभक्ती ही एक दिवसापुरती मर्यादीत न राहता ती तीनशे पासष्ट दिवस आपल्यात असायला हवी. यावेळी प्रा.डॉ. प्राची पाथरकर म्हणाल्या की, विद्यार्थ्यांनी इंग्रजी शिकण्याकरीता इंग्रजीचे वाचन, लिखाण, व्याकरण वाचले तर इंग्रजी नुसती वाचताच नाही तर बोलताही येईल. पण त्यासाठी सकारात्मक प्रयत्नांची आवश्यकता आहे. आपल्या अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य मुरलीधर पवार म्हणाले की, इंग्रजी बोलणे, लिहीणे, वाचणे, ऐकणे व इंग्रजीतून संवाद साधणे ही आज काळाच गरज झाली असून विद्यार्थ्यांनी इंग्रजीमधून संवाद साधून व्यक्तीमत्व विकास साधाला पाहीजे असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. भिमराव जांभरुणकर, सुत्रसंचालन पुजा देशमुख तर आभार प्रदर्शन प्रियंका वाघ हिने केले. कार्यक्रमाला प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**Remark /Conclusion: -**

.................................................................................................................................

.................................................................................................................................

.................................................................................................................................

.................................................................................................................................

**IQAC Co-ordinator**

**Principal**

Principal
Ramrao Zanak College
Malegaon. Dist.Washim

16.02.18

# रामराव झनक महाविद्यालयात व्यक्तीमत्व विकास कार्यशाळा

तभा वृत्तसेवा
मालेगाव, १६ फेब्रुवारी




मार्गदर्शन करताना प्रा. प्राची पाथरकर व उपस्थित मान्यवर

संवाद कौशल्यातून व्यक्तिचे व्यक्तिमत्व फुलून दिसते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी संवाद कौशल्यातून व्यक्तिमत्व विकास घडवावा, असे मत युवा पत्रकार सुशील भिमजीयाणी यांनी केले.

येथील रामराव झनक कला व वाणिज्य महाविद्यालयात इंग्रजी विभागाव्दारा आयोजित संवाद कौशल्यातून व्यक्तिमत्व विकास या एकदिवशीय मार्गदर्शन कार्यशाळेत प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रामराव झनक महाविद्यालयाचे प्राचार्य मुरलीधर पवार हे होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून गोटे कॉलेजच्या इंग्रजी विभागप्रमुख प्रा.डॉ. प्राची पाथरकर, पत्रकार सुरेश डोंगरे, प्रा. भिमराव जांभरुणकर, प्रा. जमधाडे, भंडारी आदींची मंचावर उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात इंग्रजी साहित्याचे जनक विल्यम शेक्सपियर यांच्या प्रतिमा पुजन करुन झाली.

यावेळी संवाद कौशल्यातून व्यक्तिमत्व विकास या विषयावर आपले मत मांडतांना सुशील भिमजीयाणी म्हणाले की, विद्यार्थ्यांनी दररोज वर्तमानपत्र वाचनाची सवय लावावी. वेळेचे व स्वच्छतेचे महत्व समजून घ्यावे. सुक्ष्मनिरिक्षण व सकारात्मक विचारसरणी आदी गोष्टींमधून व्यक्तीमत्व विकास घडत असतो. देशभक्ती ही एक दिवसापुरती मर्यादीत न राहता ती तीनशे पासष्ट दिवस आपल्यात असायला हवी. यावेळी प्रा.डॉ. प्राची पाथरकर म्हणाल्या की, विद्यार्थ्यांनी इंग्रजी शिकण्याकरीता इंग्रजीचे वाचन, लिखाण, व्याकरण वाचले तर इंग्रजी नुसती वाचताच नाही तर बोलताही येईल. पण त्यासाठी सकारात्मक प्रयत्नांची आवश्यकता आहे. आपल्या अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य मुरलीधर पवार म्हणाले की, इंग्रजी बोलणे, लिहीणे, वाचणे, ऐकणे व इंग्रजीतून संवाद साधणे ही आज काळाच गरज झाली असून विद्यार्थ्यांनी इंग्रजीमधून संवाद साधून व्यक्तीमत्व विकास साधाला पाहीजे असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. भिमराव जांभरुणकर, सुत्रसंचालन पुजा देशमुख तर आभार प्रदर्शन प्रियंका वाघ हिने केले. कार्यक्रमाला प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**Remark /Conclusion: -**

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

**IQAC Co-ordinator**

**Principal**

Principal
Ramrao Zanak College
Malegaon. Dist.Washim

देशोन्नती

# विद्यार्थ्यांनी नकारात्मक विचार सोडून सकारात्मक विचार करावा – ॲड. सरतापे

## रामराव झनक महाविद्यालयात एक दिवशीय कार्यशाळा संपन्न





**तालुका प्रतिनिधी** / १५ फेब्रुवारी

**मालेगाव :** जीवन आनंदाने जगण्यासाठी नकारात्मक विचार न करता आत्मविश्वास बाळगा तसेच वेळेलाही महत्व देण्याचे प्रतिपादन वाशिम येथील ॲड. राजेंद्र सरपाते यांनी केले. स्थानिक रामराव झनक महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनाच्यावतीने विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय आत्मसंशोधन कार्यशाळा घेण्यात आली, यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य मुरलीधर पवार हे होते. तर प्रमुख वक्ते म्हणुन गुरुदेव आत्मसंशोधन केंद्र वाशिमचे अध्यक्ष ॲड.गजेंद्र सरपाते हे होते. या कार्यक्रमाला प्रा. नंदकिशोर गायकवाड, प्रा. भिमराव जांभरुनकर यांची प्रमुख उपस्थिती होती. सुरुवातीस संत गाडगेबाबाच्या प्रतिमेचे पूजन अध्यक्षाच्याहस्ते करण्यात आले. तर प्रमुख पाहुण्याचे स्वागत महाविद्यालयाच्यावतीने कारण्यात आले. प्रास्ताविक प्रा. नंदकिशोर गायकवाड यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्तविकातून विद्यार्थी हे निर्भिड व्हावे त्यांच्यातील आत्मसन्मान वाढावा व त्यांच्यात डेअरिंग यावी यासाठी अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगताना त्यांनी आत्मसंशोधन केंद्राचे ॲड. गजेंद्र सरपाते यांच्या कार्याचा परिचय करुन दिला.

आपल्या प्रमुख मार्गदर्शणावर भाषणातून बोलताना ॲड. गजेंद्र सरपाते यांनी माणसाची भावना विचार सर्वात महत्वाचा भाग आहे. विद्यार्थ्यांनी व मनुष्याने प्रथम स्वःताला ओळखले पाहिजे. आपल्यातील न्युनगंड बाजूला सारले पाहिजे. जीवनात नकारात्मक विचार सोडून सकारात्मक विचाराने जगावे. सकारात्मक विचार ठेवल्यास निश्चितच आनंद व समाधान मिळतो, असे सांगताना त्यांनी प्रत्येकांनी आत्मविश्वास ठेवावा. जिवनात मित्र चांगला असावा एकच मित्र असावा परंतु तो सुख दुःखात कमी येणारा असावा. विद्यार्थ्यांमध्ये कौशल्यापुर्ण साहरीकरण शिष्टाचार बॉडी लॅंग्वेज, आत्मपरिक्षणाची दुष्टी, जोश, सकारात्मक विचार या गुणाची गरज असून तोच विद्यार्थी जिवनात यशस्वी होईल. ज्ञान घेण्यासाठी कोण्या श्रीमंताच्या घरी जन्मघावा लागत नाही. त्यासाठी स्वःता डेव्हलोप झाला पाहिजे, असेही त्यांनी सांगीतले. आपल्या तब्बल दीड ते दोन तासाच्या मार्गदर्शनावर भाषनातून त्यांनी विद्यार्थ्यांना बहुमुल्य मार्गदर्शन केले. यावेळी आपल्या अध्यक्षीय भाषनातून प्राचार्य मुरलीधर पवार यांनी विद्यार्थ्यांनी व्यक्तीमत्व विकास घडवावा.

तसेच आत्मसंशोधन करुन आपल्यातील नकारात्मक विचाराला बाजूला सारावे, असे सांगताना त्यांनी ॲड. गजेंद्र सरपाते यांनी अतिशय मोलाचे व महत्वपुर्ण मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. त्यामुळे त्यांच्या विचाराला आत्मसात करा, असे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन कु. रेणुका नागापुरे हिने तर आभार मंगेश गोटे यांनी केले. कार्यक्रमाला रासेयो विद्यार्थी यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

देशोन्नती 14 जाने-15

# युवक हा देशाचा आधारस्तंभ आहे - पवार



*तालुका प्रतिनिधी* / १३ जानेवारी

**मालेगाव :** देशाचे भवितव्य युवा पिढीवर अवलंबुन असल्याचे सांगताना प्राचार्य एम. आर. पवार ह्यांनी युवकांनी सुशिक्षीत सुसंस्कारीत व जागृत असावे कारण युवक हा देशाचा आधारस्तंभ असल्याचे ही त्यांनी सांगितले ते आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

राष्ट्रीय सेवा योजनाच्या वतीने आज १२ जानेवारीला राष्ट्रीय युवादिन तथा राष्ट्रमाता जिजाऊ जयंती निमित्य कार्यक्रम घेण्यात आला. रामराव झनक महाविद्यालयात घेण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य एम. आर. पवार हे होते. या कार्यक्रमाला रा. से. योजना अधिकारी प्रा. नंदकिशोर गायकवाड, प्रा. सुनिल देव्हढे ह्यांची उपस्थिती होती. सुरूवातीस राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक प्रा. नंदकिशोर गायकवाड ह्यांनी केले. प्रास्ताविकातुन त्यांनी कार्यक्रमा बाबत माहिती दिली यावेळी कु. कामीनी तुर्के, दिपाली उगले, कु. भाग्यश्री गवळी, कु. कोरडे, गणेश शिंदे, गणेश चव्हाण, भाऊराव देवळे ह्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य एम. आर. पवार ह्यांनी आपल्या भाषनातुन राष्ट्रीय युवादिन व राष्ट्रमाता जिजाऊ जयंती निमित्य हा कार्यक्रम घेण्यात आला आहे. त्यामुळे चांगला उपक्रम आहे असे सांगताना भारताचे भवितव्य हे आता युवा पिढीवर अवलंबुन आहे. त्यामुळे आजच्या युवकाने शिक्षणाबरोबर संस्कारीत व्हावे जागृत राहावे कारण सक्षम भारताचा आधारस्तंभ युवक असल्याचे ही पवार ह्यांनी सांगितले. यावेळी बोलतांना देशात ५७ टक्के युवक असुन त्यांनी त्याची जाणीव ठेवली. तर त्यांच्यात जागृती होईल जागृतीमुळे देशाचा विकास होईल तसेच युवकांनी कोणत्याही संकटाला तोंड देण्याची क्षमता ठेवावी तेंव्हाच युवक हे जिवनात यशस्वी होईल असे सांगितले.

कार्यक्रमाचे संचालन कु. देशमुख हिने तर आभार प्रदर्शन कु. उगले हिने केले. कार्यक्रमाला महाविद्यालंयाचे विद्यार्थी विद्यार्थीनीची उपस्थिती होती. अतिशय उत्साहात हा कार्यक्रम घेण्यात आला.

**Remark /Conclusion: -**

..........................................................................................................................................

..........................................